नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/०६/२०२६ (सोमवार )**

# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ

दिनांक ०१/०६/२०२६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण पोलीस भवनमध्ये शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व अंमलदारांच्या सन्मानार्थ सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

सदर समारंभात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक , नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या हस्ते सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदारांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक श्री कैलास रामदास जाधव (जिल्हा विशेष शाखा), श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री प्रकाश मनोहर हजारे (मोटार परिवहन विभाग), श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री चंद्रशेखर गुलाबराव घडेकर (पोलीस स्टेशन उमरेड), सहायक फौजदार श्री ईश्वर दशरथ शेंद्रे (पोलीस स्टेशन बुट्टीबोरी) तसेच सहायक फौजदार श्री नामदेव कृष्णाजी वैद्य (पोलीस नियंत्रण कक्ष) यांचा समावेश होता.

यावेळी मा. पोलीस अधीक्षक यांनी सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदारांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात बजावलेल्या कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक व उल्लेखनीय योगदानाचा गौरव करत त्यांना पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद आणि यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.सदर कार्यक्रमास श्रीमती पूजा गायकवाड, पोलीस उपअधीक्षक (गृह) प्रभारी, मानव संसाधन शाखेच्या प्रभारी पोलीस उपनिरीक्षक श्रीमती ज्योत्स्ना गिरी तसेच मानव संसाधन शाखेचे अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात संपन्न झाला



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ३० लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड :—** दिनांक ३१/०५/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी गोधणी शिवार, ता. नरखेड, जि. नागपूर येथे नाकाबंदी केली असता संशयित टाटा कंपनीचा १० चक्का टिप्पर एम.एच.२७ बी.एक्स. ५००१ मिळुन आला. वाहनाची तपासणी केली असता त्यात रेती भरून असल्याचे दिसुन आले. वाहन चालक नामे १) शाहरूख सलीम अन्सारी, वय २७ वर्ष, रा. इंदीरा नगर, मोवाड आणि वाहक ०२) दिपक खुशालसिंग जखनावत, रा. मोवाड यांना रेती वाहतुकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे परवाना नव्हता. नमुद आरोपी यांनी वाहन मालक ३) फईम अलीम शेख, रा. मोवाड आणि माल खाली करणारा आरोपी ४) समीर सलीम अन्सारी, रा. मोवाड यांचे सांगणेवरून मध्यप्रदेश राज्यातुन अवैध रित्या रेतीची वाहतुक करून रेती चोरी केल्याची माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) टाटा कंपनीचा १० चक्का टिप्पर एम.एच. २७ बी. एक्स. ५००१ किंमती ३०,००,०००/—रूपये २) ०८ ब्रास रेती किंमती ५६,०००/— रूपये असा**

**एकुण ३०,५६,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांचेविरूध्द पोस्टे नरखेड येथे कलम ३०३ (२), २२४, ४९ भा.न्या.संहीता सहकलम ६६ (१), १९२,२०७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## चोरीचा गुन्हा उघड, १ आरोपी अटक,
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उघड न झालेलया गुन्हयांचा तपास करीत असतांना दिनांक ३०/०५/२०२६ रोजी मोटर सायकल चे **डिक्कीतून पैसे चोरी करणारा राजगढ येथील आरोपी संजय सिंग उर्फ बुद्धेश्वर** हा एम पी बस स्टॉप नागपुर येथे असल्याचा बाबत गोपनिय माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी तात्काळ सदर ठिकाणी जावुन आरोपीचा शोध घेतला असता आरोपी मिळुन आला. आरोपी **संजय सिंग उर्फ बुद्धेश्वर नंदकिशोर सिंग करवत, वय ४० रा. करवत मोहल्ला, राजगढ, जि. मिर्झापूर राज्य उत्तरप्रदेश** याला ताब्यात घेत सखोल चौकशी केली असता त्याने त्याच्या साथीदारांसह पोलीस स्टेशन सावनेर येथुन मोटर सायकल चे **डिक्कीतून पैसे चोरी केल्याचे सांगितले.**

**पोलीसांनी पंचासमक्ष रोख रक्कम ३५,०००/— रूपये असा मुद्देमाल जप्त केला आहे. पो.स्टे. सावनेर अप.क. २८५/ २६ कलम ३०३,(२) भान्यासं हा गुन्हा उघड झाला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




**गुन्हा उघड करणारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. स्थानिक गुन्हे शाखा आणि कन्हान पोलीसांची संयुक्त कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ३१/०५/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा बोर्डा शिवार रेल्वे पटरी जवळील शिवारात कन्हान येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कन्हान पोलीसांसह संयुक्त कारवाई करत घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) अमोल देवमन तिमांडे, वय ३० वर्षे, रा. स्वामी विवेकानंद कन्हान, २) सोहेल वकील खान, वय ३४ वर्षे, रा. स्वामी विवेकानंद नगर, कन्हान ३) पियुष अजित शेंडे, रा. न्यु मार्केट कन्हान ४) हार्दीक राकेश काळे, वय २७ वर्षे, रा. जय भीम चौक, कामठी, ह.मु. आंबेडकर बाल, पारशिवनी** हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले. काही आरोपी पोलीसांना पाहुन पळुन गेले.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन १) नगदी १६,०००/—रूपये २) ५२ ताशपत्ते व बॅटरी किंमती ३,५००/—रूपये व इतर साहित्य असा एकुण**

**१९,५५०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे १२ महाराष्ट्र जुगार कायदा, सहकलम ४९ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपींविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ०७ गुन्हे नोंद

दिनांक ३१/०५/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयांतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपींविरूद्ध खालीलप्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी १) रामजी पानसे, वय २८ वर्ष, रा. खापरी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर हा मौजा मरडवार लेआउट ब्राम्हणी येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला , २) आरोपी साहील विनोद दुपारे, वय २३ वर्ष, रा. लोणारा, ता. कळमेश्वर, जि. नागपूर हा मौजा कळंबी रोडवरील पुलाचे बाजूला सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. ३) **आरोपी** पवन शंकरराव मेश्राम, वय ४५ वर्ष, रा. लोनारा हा मौजा मरडवार ले आउट ब्राम्हणी येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला आणि ४) आरोपी दिपक मनोहर कपाळे, वय ५४ वर्ष, रा. मरडवार ले आउट कळमेश्वर हा मौजा मरडवार ले आउट उडाणपुलाचे जवळ सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत आरोपी रोशन परसराम चौरे, वय २९ वर्ष, रा. जलालखेडा, ता. नरखेड हा मौजा जलालखेडा बस स्टॉप येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत आरोपी ईशाक इकबाल शाहा, रा. पेठबुधवार काटोल, जि नागपुर हा रेल्वे स्टेशन काटोल येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत आरोपी दादाराव संपत घाटोळे, वय ४१ वर्ष, रा. निंबा, पारशिवनी ता. पारशिवनी जि. नागपूर हा पंचायत समिती परीसर येथे अंमली

पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपी विरूध्द कलम २७ एनडीपीएस कायदयान्वये प्रत्येकी १ असे ७ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू निर्मिती, दारू बाळगुण विक्री, तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०९ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक ३१/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, देशी दारू तसेच इतर साहित्य असा एकुण ४,५८,३२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.** महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे रोशन अरूण डेकाटे, वय २८ वर्ष, रा. खापा, ता. सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, पोलीस **स्टेशन उमरेड** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नितीन लक्ष्मणजी खडसे, वय २५ वर्ष, रा. वार्ड क्र २, कुही याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे १) ०२ महिला आरोपी २) नानु उर्फ द्यानेश्वर लालचंद पवार, वय २७ वर्ष, रा. चांपा, तह. उमरेड, जि. नागपूर ३) राहूल भीवाजी मेश्राम, वय ३० वर्ष, रा. जागृत नगर, वानखेडे पेट्रोल पंप जवळ नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी बंडु गणुजी उईके, वय ४० वर्ष, रा. खापरी बारोकर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी प्रफुल दिपक तायडे, वय २८ वर्ष, रा. सिंजर, ता. नरखेड याचे वर १ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण ७२० मिली देशी दारू, ९९०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, ६७५ लिटर मोहाफुल दारू, इतर साहित्य असा एकुण ४,५८,३२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने